महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी,मुंबई या कार्यालयास सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी अनिवार्य खर्चासाठी अनुदान वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : उसाअ-२०१९/प्र.क्र.६/उसाअ/का-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १२.०६.२०१९

वाचा :-

१) शासन परिपत्रक, वित्त् विभाग क्रमांक : अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थसंकल्प्-३ दि.१.४.२०१९
२) शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग,क्रमांक : : अविवि-२०१९/प्र.क्र.१४/का-७ दि.९.४.२०१९
३) शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक : उसाअ-२०१९/प्र.क्र.६/उसाअ/का-५ दि.११.६.२०१९

प्रस्तावना :-

राज्यात उर्दू भाषेचा विकास, संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारिक आदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमीच्या आस्थापनेवरील (अनिवार्य) खर्चाच्या बाबीकरिता वरील संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर अनुदानातून रु.६,७०,०००/-(अक्षरी रूपये सहा लाख सत्तर हजार फक्त्) खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार वर्ष २०१९-२० या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमीसाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मंजूर असलेल्या अनुदानापैकी एप्रिल ते जुलै,२०१९ या चार महिन्याकरिता आवश्यक असणारे अनुदान वितरीत करण्यास वरील संदर्भ क्र.२ येथील शासन पूरक पत्रकान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर बाब विचारात घेता, महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमीच्या आस्थापनेवरील (अनिवार्य) खर्चाच्या बाबीकरिता सन २०१९-२० मध्ये “मागणी क्र. झेडई १,२२०५ कला व संस्कृती, १०२-कला व संस्कृती प्रचालन (००) (०१) उर्दू अकादमीची आस्थापना/दत्तमत, ३१ सहाय्य्क अनुदान (अनिवार्य) (२२०५ ३०२७)” या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या रु.२०,००,०००/-(अक्षरी रुपये-वीस लाख फक्त्) अनुदानापैकी एप्रिल ते जुलै,२०१९ या ४ महिन्याच्या मर्यादित कालावधीसाठी रु.६,७०,०००/- इतका निधी वितरणासाठी उपलब्ध् असल्याने रु. ६,७०,०००/- (रुपये सहा लाख सत्तर हजार फक्त्) इतके अनुदान माहे एप्रिल,२०१९ ते जुलै,२०१९ या कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी, मुंबई या कार्यालयास वितरीत करण्यात येत आहे. अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी,मुंबई यांनी मंजूर खर्च विहित मर्यादेत राहिल याची दक्षता घ्यावी.

२. सदर रकमेचा ईसीएस (ECS) अवर सचिव(१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावाने काढण्यात यावा.

३. उपरोक्त् खर्च "मागणी क्र. झेडई १,२२०५ कला व संस्कृती, १०२-कला व संस्कृती प्रचालन (००) (०१) उर्दू अकादमीची आस्थापना(अनिवार्य), ३१ सहाय्क्क अनुदान (अनिवार्य) (२२०५ ३०२७)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यास यावा.

४. अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी,मुंबई यांनी सदर खर्चाचे तपशील व निधीच्या विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणे अनिवार्य राहिल.

५. हा शासन निर्णय वित्त् विभागाच्या शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थस-२०१९/प्र.क्र.४४/अर्थसंकल्प्-३, दि.१.४.२०१९ अन्वये प्राप्त् अधिकाराखाली निर्गमित करण्यात येत आहे. या शासन परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या सर्व परिच्छेदांची तसेच सदर शासन परिपत्रकांसोबतच्या परिशिष्टातील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध् करण्यात आला असून त्याच्या संगणक संकेताक २०१९०६१२१७२६५८१९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2019.06.12 17:11:32 +05'30'

**(सं.छ.तडवी)**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. महालेखापाल १/२ (लेखापरिक्षा), (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १,मुंबई/नागपूर ,
२. संचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. सह सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अवर सचिव/कक्ष अधिकारी,(का-५) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अवर सचिव (का-७)/(का-२) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (२ प्रतीत)
७. खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी, मुंबई (अकादमीच्या कार्यालयामार्फत)
९. अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी, मुंबई.
१०.प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११.निवड नस्ती (महाराष्ट्र राज्य् उर्दू साहित्य् अकादमी, मुंबई.)